# जाहिर नोटीस
# प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की,.....

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी अधिपत्याखाली नव्याने स्थापन होणा—या दिवाणी न्यायालय व.स्तर, चिपळूण येथे न्यायालयीन व कार्यालयीन कामकाजाकरिता एक कॅशबॉक्स खरेदी करणेचे आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | नग |
|---|---|---|
| १ | गोदरेज कॅशबॉक्स<br>(Godrej Cash Box)<br>Size (mm)<br>(151H X 356W X 254D)<br>Weight 13.7 kg<br>Volume 6.3L | ०१ |

तरी ज्या कोणा व्यक्ती अगर संस्थेस वर नमूद तपशीलाप्रमाणे जिल्हा न्यायालय, रत्नागिरी अधिपत्याखाली नव्याने स्थापन होणा—या दिवाणी न्यायालय व.स्तर, चिपळूण येथे न्यायालयीन व कार्यालयीन कामकाजाकरिता **एक कॅशबॉक्स पूरविणे शक्य असेल** त्यांनी निविदा (दरपत्रके) खालील अटी व शर्तीस अधिन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेपासुन आठ दिवसांचे आत म्हणजेच दिनांक १४/०८/२०२६ पर्यंत सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून दयावीत.

## दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे. दरपत्रकात GST क्रमांक नमूद असावा व पॅनकार्डची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत जोडावी.

२. दरपत्रक बंद लखोटयातून असावे व लखोटा जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचे नावे नमूद असावा. सदर लखोटयावर 'दिवाणी न्यायालय व.स्तर, चिपळूण करिता कॅशबॉक्स' खरेदीबाबतचे दरपत्रक असे नमूद असावे.

३. जाहीर नोटीस मध्ये दिलेल्या तारखेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

४. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रक विचारात घेणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५. पुरविणेत आलेला 'कॅशबॉक्स' हा चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. खराब निघाल्यास नव्याने पुरविणे बंधनकारक राहील. दरपत्रकामध्ये वॉरंटी तसेच गॅरंटी बाबत सविस्तरपणे नमुद असावे.

६. महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील पुरवठादारांनी निविदा भरु नये. अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.

७. सदरची जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी या न्यायालयाच्या https://ratnagiri.dcourts.gov.in या संकेतस्थळावरती प्रसिध्द करणेत आलेली आहे

८. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहील.

आज दि. ०७/०८/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

DISTRICT COURT OF RATNAGIRI

दिनांक— ०७/०८/२०२६

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी

म.जा.क्र. वित्त/ ८०८ /२०२६
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक— ०७/०८/२०२६

**प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी—**

१. सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
२. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी.
३. मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, रत्नागिरी.
४. मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.
५. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
६. मा. तहसिलदार कार्यालय, रत्नागिरी.
७. नगरपरिषद, रत्नागिरी.